## प्रेस नोट ता.१९/०६/२०२०

# कुख्यात गुंड निलेश घायवाळ टोळीतील सदस्यास पिस्टल व दोन काडतुसासह हिंजवडी येथुन अटक

## गुन्हे शाखा, युनिट १, पिंपरी चिंचवडची कारवाई,

दि.१८/०६/२०२० रोजी गुन्हे शाखा, युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे यांचे आदेशानुसार पोलीस उप निरीक्षक काळुराम लांडगे, पोलीस कर्मचारी सचिन उगले, गणेश सावंत, विजय मोरे, प्रविण पाटील, नितीन खेसे असे हिंजवडी पोलीस स्टेशन हद्दीत रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करीत असताना **पोलीस शिपाई गणेश सावंत** यांना माहिती मिळाली की, पोलीस रेकॉर्ड वरील गुन्हेगार **दत्ता उर्फ बबलु मालपोटे** याचे जवळ पिस्टल असुन तो हिंजवडी येथील बापुजी बुवा मंदिराजवळ कोणासतरी भेटण्यासाठी येणार आहे. वगैरे मजकुरची माहिती मिळताच वपोनि उत्तम तांगडे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे पोउनि काळुराम लांडगे हे वरील स्टाफसह बापुजी बुवा मंदिर परीसरामध्ये सापळा लावुन थांबले असता बातमीतील वर्णनाचा एक इसम हा पायी चालत येवुन मंदिराचे समोर येवुन थांबला. त्यास पकडणे कामी जात असताना त्यास पोलीसांची चाहुल लागल्याने तो पळुन जावुन लागला त्याचा पाठलाग करून त्यास मोठ्या शिताफीने पकडले. तेव्हा आरोपी **दत्ता उर्फ बबलु बाळु मालपोटे, वय २६ वर्षे, रा. कात्ररखडक गांव ता. मुळशी, जि. पुणे** याची अंगझडती घेतली असता त्याचे कमरेस डावे बाजुस खोचलेले **एक देशी बनावटीचे पिस्तोल व त्यामध्ये दोन जिवंत काडतुसे** मिळुन आले. त्यास ताब्यात घेवुन त्याचे विरूध्द बेकायदेशीर रित्या शस्त्र जवळ बाळगले प्रकरणी भारतीय शस्त्र अधिनियमान्वये हिंजवडी पोलीस ठाणेस गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी दत्ता उर्फ बबलु मालपोटे हा **कुख्यात गुंड निलेश घायवाळ टोळीचा सदस्य** असुन त्याचे विरूध्द पौड, कोथरूड, दिघी, लोणावळा पोलीस स्टेशन येथे खुन, दरोडा, अपहरण, आर्म अ‍ॅक्ट असे गंभीर स्वरूपाचे एकुण ६ गुन्हे दाखल आहेत. आरोपी याने निलेश गावडे व इतर साथदारांचे मदतीने सन २०१८ मध्ये गजानन मारणे टोळीचा सदस्य राजु कुंभार याचा पौड पोलीस स्टेशन अंतर्गत खुन केला होता.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त श्री सुधिर हिरेमठ, सहायक पोलीस आयुक्त श्री आर.आर.पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे, सहायक पोलीस निरीक्षक गणेश पाटील, पोलीस उप निरीक्षक काळुराम लांडगे तसेच पोलीस कर्मचारी सचिन उगले गणेश सावंत, प्रविण पाटील, विजय मोरे, प्रमोद लांडे, नितीन खेसे, मनोजकुमार कमले यांनी केली आहे.